24 DEC 2023

जनसंपर्क कक्ष

पुढारी

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधकांनी इतिहासाची वस्तुनिष्ठ मांडणी करावी : डॉ. चौसाळकर

## शिवाजी विद्यापीठात मराठा इतिहासावरील परिषदेचा समारोप



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या समारोप समारंभात बोलताना डॉ. अशोक चौसाळकर. व्यासपीठावर डॉ. सी. आर. दास, डॉ. चंद्रकांत अभंग, डॉ. अवनीश पाटील आदी. (छाया : नाज ट्रेनर)

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

इतिहासाच्या अभ्यासक व संशोधकांनी इतिहासाची वस्तुनिष्ठ व परखड मांडणी करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले.

महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचलनालय आणि शिवाजी विद्यापीठ छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शिवराज्याभिषेक दिन व स्वराज्य स्थापना दिन यांच्या ३५० व्या वर्धापन वर्षानिमित्त 'मराठा इतिहास संशोधनाचा कक्षाविस्तार' या विषयावरील तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. चौसाळकर म्हणाले, सद्यस्थितीत इतिहास ही ज्ञानशाखा धोक्याच्या विळख्यात सापडली आहे. अस्मितादर्शी राजकारणासाठी इतिहासाचा गैरवापर करण्यात येत आहे. यापासून अभ्यासक, संशोधकांसह समाजानेही सावध व सजग असायला हवे. वस्तुनिष्ठइतिहास लोकांसमोर आणण्यासाठी प्रयत्नरत राहण्याबरोबरच प्रसंगी परखड भूमिका घेतली जाणेही आवश्यक आहे.

परिषदेस उपस्थित पाहुण्यांसाठी मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शनही शिवाजी विद्यापीठ संग्रहालय संकुल येथे भरवण्यात आले होते. या प्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा व नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. परिषद यशस्वी होण्यासाठी समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप, कोल्हापूर वस्तुसंग्रहालयाचे सहायक संवर्धक उदय सुर्वे आणि इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी परिश्रम घेतले. समारोप समारंभास डॉ. सी. आर. दास, डॉ. चंद्रकांत अभंग, जम्मू विद्यापीठाचे डॉ. जिगर मोहम्मद, अलिगढ विद्यापीठाचे डॉ. इश्रत आलम, डॉ. वर्षा शिरगावकर, डॉ. उदय सुर्वे आदी उपस्थित होते.

24 DEC 2023

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इतिहासाची परखड मांडणी गरजेची

## ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांचे प्रतिपादन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित परिषदेत मार्गदर्शन करताना डॉ. अशोक चौसाळकर. सोबत डॉ. सी. आर. दास, डॉ. चंद्रकांत अभंग, डॉ. अवनीश पाटील, डॉ. जिगर मोहम्मद, डॉ. इश्रत आलम, डॉ. वर्षा शिरगांवकर, डॉ. नीलांबरी जगताप.

प्रतिनिधी
कोल्हापूर

इतिहासाच्या अभ्यासक व संशोधकांनी इतिहासाची वस्तुनिष्ठ व परखड मांडणी करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले.

महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, पुरातत्त्व आणि वस्तुसंग्रहालय संचालनालय आणि शिवाजी विद्यापीठाचे छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शिवराज्याभिषेक दिन व स्वराज्य स्थापना दिन यांच्या ३५० व्या वर्धापन वर्षानिमित्त 'मराठा इतिहास संशोधनाचा कक्षाविस्तार' या विषयावरील तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचा समारोप विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात झाला. याप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. चौसाळकर म्हणाले, सद्यस्थितीत इतिहास ही ज्ञानशाखा धोक्याच्या विळख्यात सापडली आहे. अस्मितादर्शी राजकारणासाठी इतिहासाचा गैरवापर करण्यात येत आहे. यापासून अभ्यासक, संशोधकांसह समाजानेही सावध व सजग असायला हवे. वस्तुनिष्ठ इतिहास लोकांसमोर आणण्यासाठी प्रयत्न करण्याबरोबर परखड भूमिका घेतली पाहिजे. खोटा इतिहास पसरविण्यासाठी होत असलेला समाजमाध्यमांचा वापर रोखला पाहिजे. अनेक तोतया इतिहासकार आपल्या स्वार्थासाठी इतिहासाचा वापर करून घेत आहेत. त्यांनाही रोखण्याची गरज असल्याचे मत त्यांनी सांगितले. राष्ट्रीय परिषदेसाठी देशभरातून विविध विद्यापीठांतील अनेक तज्ज्ञ, अभ्यासकांनी उपस्थित राहून मराठा इतिहासाच्या अनुषंगाने शोधनिबंध सादर केले. मराठा इतिहासाची साधने, इतिहास लेखन, मराठा इतिहासातील आर्थिक पैलू, सामाजिक- सांस्कृतिक इतिहास, पुरातत्त्व, कला आणि स्थापत्य, मराठा युरोपियनांचे आपापसातील संबंध, लष्करी इतिहास अशा विविध विषयांवरील दर्जेदार शोधनिबंधांचा त्यात समावेश होता.

समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप, कोल्हापूर वस्तुसंग्रहालयाचे सहाय्यक संवर्धक उदय सुर्वे आणि इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी परिश्रम घेतले.

यावेळी डॉ. सी. आर. दास, डॉ. चंद्रकांत अभंग, जम्मू विद्यापीठाचे डॉ. जिगर मोहम्मद, अलिगढ विद्यापीठाचे डॉ. इश्रत आलम, डॉ. वर्षा शिरगांवकर, डॉ. उदय सुर्वे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
24 DEC 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. ज्योती जाधव : न्यू कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय परिषद

# परस्पर सहकार्यातूनच सर्वोत्तम संशोधन निर्मिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** एकविसावे शतक हे मुख्यत्वे नॅनो टेक्नॉलॉजीचे आहे. कष्ट, सातत्य आणि प्रामाणिकपणा या गुणांच्या आधारे भारतीय शास्त्रज्ञ जगभरात सर्वोत्तम कामगिरी करतात. परस्पर सहकार्यातूनच उत्तम संशोधन निर्मिती शक्य होते, असे प्रतिपादन प्रा. डॉ ज्योती जाधव यांनी केले.

न्यू कॉलेज आणि सोळांकूर येथील यशवंतराव पाटील सायन्स कॉलेज यांच्यातर्फे नॅनो मटेरियल्स फॉर एनर्जी अँड एन्व्हायर्न्मेंट या विषयावरील सहाव्या आंतरराष्ट्रीय परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील उपस्थित होते. या परिषदेत फ्लोरेन्सिओ बॅलेस्टेरॉस ज्युनिअर फिलिपाईन्स, दीपक डुबल, डॉ. मुरलीकृष्ण एस. डॉ. संदीप घोलप यांनी मार्गदर्शन केले.

४० संशोधकांनी मौखिक सादरीकरण व ३० संशोधकांनी भित्तिचित्रे सादर केली. मौखिक सादरीकरणात न्यू कॉलेजच्या प्रा. स्वप्नाली पवार यांनी प्रथम, जयपूर विद्यापीठाच्या अनुपम शर्मा यांनी द्वितीय, बंगळुरू विद्यापीठातील अनिरुद्ध भिडे यांनी तृतीय क्रमांक मिळवला. डॉ. आर. बी. पाटील यांनी स्वागत केले. प्रा. जे. एस. क्षीरसागर यांनी आढावा घेतला.



न्यू कॉलेजमध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत प्रा. डॉ. ज्योती जाधव यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांच्यासह प्राध्यापक उपस्थित होते.

सहभागी संशोधन विद्यार्थ्यांनी परिषदेबाबत मनोगते व्यक्त केली. डॉ. व्ही. आर. मोरे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ए. एम. पोवार व प्रा. ए. डी. श्रीराम यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 DEC 2023
महासत्ता

# मुलीबरोबरच वडीलांनाही कुलगुरूंच्या हस्ते पदवी

मिरज, ता. २४ (प्रतिनिधी)–

शिवाजी विद्यापीठाचा पदवीदान समारंभ नुकताच पार पडला. यावेळी मिरजेतील बापूजी साळुंखे महाविद्यालयातून इंग्रजी माध्यमातून राज्यशास्त्रातील बीए पदवी रेवती रवींद्र फडके हिने घेतली. त्याचबरोबर तिचे वडील प्रा. डॉ. रवींद्र मोरेश्वर फडके यांनी वयाच्या साठाव्या वर्षी एलएलबी स्पेशल ही सहावी पदवी प्राप्त केली.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. दिगंबर तुकाराम शिर्के यांच्या हस्ते व प्र.कुलगुरू प्रा.डॉ.प्रमोद शंकर पाटील व कुलसचिव डॉ. विलास नेताजी शिंदे यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. यावेळी सौ. मीनाक्षी फडके व शितल कांदेकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
24 DEC 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आय विटनेस साईसिमरनचा सांगलीत सत्कार



शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागाची विद्यार्थिनी साईसिमरन घाशी (मूळ गाव, शिराळा) हिचा राष्ट्रपती सुवर्णपदक मिळाल्याबद्दल शनिवारी सांगलीत पालकमंत्री सुरेश खाडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, खासदार संजय पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 DEC 2023
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांची पाटगावला भेट

कोल्हापूर : राष्ट्रीय पातळीवर गौरवलेल्या भुदरगड तालुक्यातील मधाचे गाव पाटगावला शिवाजी विद्यापीठ मास कम्युनिकेशन व पी.जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नलिजमच्या विद्यार्थ्यांनी अभ्यास भेट दिली. विद्यार्थ्यांनी पाटगाव ग्रामपंचायत, माहिती व प्रशिक्षण दालन, सेल्फी पॉईंट, लावण्यात आलेले आकर्षक फलक, पर्यटनवाढीसाठीचे उपक्रम व जंगलातील मध पेट्यांची पाहणी करून मध उद्योगाबाबत माहिती जाणून घेतली. दरम्यान, मौनी महाराज मठ येथे झालेल्या कार्यक्रमात बोलताना डॉ. शिवाजी जाधव म्हणाले, मध उद्योग व पर्यटनपूरक उद्योगातून पाटगाव स्वयंपूर्ण होत आहे. मधाचे गाव पाटगावचा अभ्यास करून येथील मध उत्पादन, विक्री व पर्यावरणपूरक शाश्वत विकासाबाबतची माहिती सर्वदूर पोहोचवण्यासाठी विद्यार्थ्यांची मदत होईल. सोशल मीडियासह विविध माध्यमांद्वारे पाटगावच्या मध उत्पादनाबरोबरच या भागातील पर्यटनस्थळांचीही माहिती अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन माहिती अधिकारी वृषाली पाटील यांनी केले. महेश ढोकरे यांनी मधाचे उपयोग, मधनिर्मितीचे टप्पे, ब्रॅण्डिंग, पॅकेजिंग व मार्केटिंगबाबत माहिती दिली. जिल्हाधिकारी राहुल रेखावार, कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार अश्विनी अडसूळ, ग्रामोद्योग अधिकारी श्रीकांत जौंजाळ यांच्या सहकार्याने याचे आयोजन केले होते. यावेळी पाटगाव मध उत्पादक शेतकरी संस्थेचे अध्यक्ष वसंत वास्कर, सचिव विलास सोनवणे, संचालक महेश ढोकरे, सुभाष कदम, ग्रामस्थ उपस्थित होते.

24 DEC 2023
महासत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आजरा महाविद्यालयाचे 'अविष्कार' स्पर्धेत सुयश

आजरा, ता. २२ (प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या सन २०२३-२४ मधील अविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये आजरा महाविद्यालयाने घवघवीत यश मिळविले.

महाविद्यालयाची विद्यार्थिनी मिसबाह इनायतुल्ला बागवान हिने विद्यापीठ स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला. 'निओलॉजीजम' विषयावर तिने संशोधन प्रकल्प केला होता. महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाच्यावतीने 'लँग्वेज आणि ह्युमॅनीटी' विभागातून हा संशोधन प्रकल्प तयार करण्यात आला होता. या 'अविष्कार' स्पर्धेसाठी प्रथम संस्थांत्मक स्तरावर तिने सादरीकरण केले. त्यानंतर विवेकानंद कॉलेज येथे झालेल्या इंटरकॉलेज स्तरावर तिने दुसरा क्रमांक मिळविल्याने विद्यापीठ स्तरावर तिची निवड झाली. आता जानेवारी महिन्यामध्ये नाशिक येथे होणाऱ्या पुढील इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धा फेरीसाठी तिची निवड झाली आहे. या यशाबद्दल अशोक चराटी, विलास नाईक आणि विजयकुमार पाटील यांनी अभिनंदन केले.



मिसबाह बागवान हिने प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल तिचा सत्कार करताना अशोक चराटी, प्राचार्य अशोक सादळे आदी.

या संशोधन प्रकल्पासाठी डॉ. श्रीमती एस.आय. मणेर यांचे तसेच प्रा. रमेश चव्हाण, प्रा. शेखर शिउडकर आणि डॉ. अविनाश वर्धन, डॉ. तानाजी कावळे, प्रा. मलिकार्जुन शिंत्रे यांचे मार्गदर्शन लाभले. तर प्राचार्य डॉ. अशोक सादळे, योगेश पाटील, दिलीप संकपाळ यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 4 DEC 2023
पुढारी

# हिवाळी सत्रातील ३४० परीक्षांचे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर ३४० अभ्यासक्रमांचे निकाल आजअखेर घोषित करण्यात आले आहेत. विद्यापीठ हिवाळी सत्र अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. शनिवारी मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ कॉम्प्युटर अॅप्लिकेशन, मास्टर ऑफ लॉ, मास्टर ऑफ सायन्स, मास्टर ऑफ जर्नालिझम आदी विषयांच्या परीक्षा झाल्या. परीक्षेला ६२९ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, दि. २१ रोजी एम.एस्सी. (मानसशास्त्र), बी.ए. (स्पोर्टस्), एम.एस्सी. (अप्लाईड अँड इन्फॉर्मेटिक्स), एम.एस्सी. (फार्मासिट्यूकल मायक्रोबायलॉजी), बायो केमिस्ट्री आदी ६० विषयांचे निकाल जाहीर झाले, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
24 DEC 2023 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शहाजी महाविद्यालयाला विजेतेपद

## मुलींच्या विभागीय क्रिकेट स्पर्धा; महावीर महाविद्यालयाला उपविजेतेपद

▶ सकाळ वृत्तसेवा

इचलकरंजी, ता. २३ : येथील राजाराम स्टेडियम मैदानावर झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या मुलींच्या विभागीय क्रिकेट स्पर्धेत श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाने (कोल्हापूर) विजेतेपद पटकावले. उपविजेतेपद महावीर महाविद्यालय, कोल्हापूरने पटकावले, तर तृतीय क्रमांक कमला कॉलेज, कोल्हापूर आणि चौथा क्रमांक श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी संघाने पटकावला. चारही संघ ४ ते ६ जानेवारीला होणाऱ्या आंतरविभागीय विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरले.



इचलकरंजी : मुलींच्या कोल्हापूर विभागीय क्रिकेट स्पर्धेत श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाने विजेतेपद पटकावले.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर विभागीय क्रीडा परिषद, प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय, मलकापूर - पेरीड यांच्यातर्फे येथील श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयातर्फे या महिला क्रिकेट स्पर्धा घेण्यात आल्या. एकूण दहा मुलींच्या संघाने या स्पर्धेत सहभाग घेतला. राजाराम स्टेडियमवर स्पर्धेचे उद्घाटन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरचे कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे व कोल्हापूर विभागाचे सचिव प्रा. सुहास वाघ यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. त्रिशला कदम होत्या. यावेळी बोलताना श्रीराम साळुंखे म्हणाले, ''क्रिकेट खेळात फक्त पुरुषांची मक्तेदारी न राहता मुलीही देदीप्यमान कामगिरी करत आहेत. स्पर्धांच्या माध्यमातून खेळाबरोबरच सांघिक भावनाही जपावी.''

स्पर्धेचा अंतिम सामना महावीर कॉलेज विरुद्ध शहाजी कॉलेज यांच्यात झाला. या सामन्यात शहाजी कॉलेजने महावीर कॉलेजच्या संघावर एकतर्फी मात करत तब्बल नऊ विकेटने विजेतेपद मिळवले.

महावीर कॉलेजला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. तिसऱ्या क्रमांकासाठी कमला कॉलेज विरुद्ध कन्या कॉलेज असा सामना खेळवण्यात आला. या सामन्यात कमला कॉलेजने नऊ विकेटने कन्या कॉलेजवर सहज विजय मिळवला. बक्षीस वितरण समारंभ स्मिता बुगड, कोल्हापूर विभाग क्रीडा परिषदेचे सचिव वाघ, प्राचार्य प्रो. डॉ. त्रिशला कदम, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. सविता भोसले, प्रा. संगीता पाटील, प्रा. संदीप पाटील, प्राध्यापक डॉ. सुभाष जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.